स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२१ वर्ष

सच करीब से ही दिखता है...!

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

● बीड ● बुधवार, दिनांक ११ मार्च २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ७१ ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये


# रेल्वे भूसंपादन मावेजा महाघोटाळा करणाऱ्या 'त्या' एजंटच्या घरांवर ईडीने छापे टाकावेत एवढी संपत्ती आली कुठून?

असे म्हणतात की, पत्रकारांना डीपमध्ये जाऊ दिले नाही पाहिजे परंतु, प्रकरण मुळासकट खाणून न काढणारे ते बीडचे पत्रकार कसले?

म्हणे! रेल्वे भूसंपादन मावेजा महाघोटाळ्यात शेतकऱ्यांना 20%, संबंधित कर्मचाऱ्यांना 30% तर एजंटने 50% घेतले ते सगळे बाहेर येणार!!

रेल्वे भूसंपादन मावेजा महाघोटाळा प्रकरणी याचिका दाखल होताच 'मे' महिन्यात मी मी म्हणणाऱ्या एजंटांना पळता भुई थोडी होणार!!

## प्रक्रिया पूर्ण होऊन याचिका दाखल होताच त्या एजंटला 'मे' मध्ये बसणार दणका!!

**बीड : बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यामध्ये रेल्वे भूसंपादन मावेजा प्रकरणात महाघोटाळा झाल्याचे सर्वसामान्य जनतेमध्ये आता सर्रास बोलले जात आहे. विशेष म्हणजे या महाघोटाळ्यात काही न करता काही शेतकऱ्यांनी संबंधित एजंट लोकांशी संगणमत करून शेतात आंबा चिंच अशी झाडे नसताना शेकडो झाडे दाखवून नको तेवढा मावेजा घेतला असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे शासनाला खुलेआम कोट्यावधींची लूट करणाऱ्यांना आता या प्रकरणात प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होत आली असून यानंतर न्यायालयात याचिका दाखल होतात या प्रकरणात मोठा बॉम्बस्फोट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आमचे कोणीच काही वाकडे करू शकत नाही आणि झालेच कोणाचे वाटोळे तर यामध्ये 'ते' शेतकरी आणि 'त्या' अधिकाऱ्यांचे ज्यांनी आमच्याकडून पैसे घेऊन काम केले, असे म्हणणाऱ्या त्या एजंटची आतून पुरती फाटलेली पण चेहऱ्यावर न दाखवणाऱ्या एजंटला पळता भुई थोडी होणार यात शंकाच नाही, असेही बोलले जात आहे. दरम्यान एकूणच या प्रकरणात मे महिन्यात काय बॉम्बस्फोट होणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**



सामान्य जनतेचा होतोय संताप

### ईडीने छापा टाकावा इतकी संपत्ती या दोन-तीन एजंटकडे आली कुठून?

● आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यामध्ये रेल्वे भूसंपादन मावेजामध्ये मोठा घोटाळा झाल्याचे आता उघड उघड बोलले जात आहे. असे सांगितले जाते की या प्रकरणातील जे एजंट आहेत त्यांना मागच्या दहा वर्षांपूर्वी गावातून बीडला येण्यासाठी बसच्या तिकिटाला पैसे नसायचे आज त्यांच्याकडे पैशांची काहीच कमतरता नसून बागायती शेती, प्लॉटिंगचा व्यवसाय करण्यासाठी आणि अहिल्यनगर, पुणे यासारख्या महागड्या शहरांमध्ये टू बीएचके, थ्री बीएचके घेण्याची ताकद आणि पैसा आला कुठून? या एजंट लोकांनी या दहा वर्षात असा नेमका कोणता व्यवसाय केला की, यांच्याकडे आज कोट्यावधी रुपयांची मालमत्ता असल्याचे बोलले जात आहे. एकूणच या एजंटकडे अमाप पैसा पाहता यांच्या घरांवर ईडी छापा टाकू शकते, असेही बोलले जात आहे.




**मे महिन्यात रेल्वे भूसंपादन मावेजा महा घोटाळ्याचा होईल बॉम्बस्फोट!!**

● बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर येथील रेल्वे भूसंपादन मावेजा महाघोटाळ्याची चर्चा आता बीड जिल्ह्यापर्यंत मर्यादित राहिलेली नसून ती आता महाराष्ट्रात पोहोचली आहे. त्यामुळे साहजिकच याकडे आता गांभीर्याने पाहिले जात आहे. विशेष म्हणजे या प्रकरणाची जोरदार चर्चा झाल्याने ज्या ज्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी या प्रकरणात पैसे घेऊन काम केले ते मे महिन्यात कदाचित उघडे पडतील अशी अपेक्षा आहे. त्याचे महत्त्वाचे कारण असे सांगितले जात आहे की, सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट होणार असून या याचिकेच्या अनुषंगाने माननीय न्यायालय या प्रकरणाची सॅटॅलाइट द्वारे पाहणी करून चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला देऊ शकतात. सॅटेलाईट द्वारे या भागाची पाहणी झाली तर दहा वर्षांपूर्वी अथवा पंधरा ते वीस वर्षांपूर्वी त्या ठिकाणी किती सिमेंट काँक्रीटची घरे होती तसेच किती झाडे होती ते दिसून येणार आहे. त्यामुळे दूध का दूध और पानी का पानी व्हायला अजिबात वेळ लागणार नाही. कदाचित या न्यायालयीन प्रक्रियेला थोडासा वेळही लागू शकतो परंतु, 'सत्य परेशान हो सकता है लेकीन पराजित नही' हेही तितकेच खरे!

### आष्टी आणि परळीच्या जवळचा असल्याचे दाखविणाऱ्या एजंटचा बाजार उठला!!

● संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यामध्ये जे समाजकारण, राजकारण आणि निर्माण झालेली जातीय तेढ पाहता आपल्या कार्यकर्त्यांनी केलेल्या कोणत्याही चुका झाकण्याचा किंवा त्यावर पडदा टाकण्याची हिंमत सध्यातरी कोणताच नेता करीत नसल्याचे पहावयास मिळत आहे. त्यामध्ये विशेष करून बीड जिल्ह्यातील आष्टी आणि परळीतील नेते तर सध्या ताकही फुंकून पीत असल्याचे त्यांच्या एकंदरीत वागण्यातून दिसून येत आहे. अशा एकंदरीत बीड जिल्ह्यातील संवेदनशीलच नव्हे तर अतिसंवेदनशील वातावरणात या एजंट लोकांना वाचवण्यासाठी कोणताही फायर ब्रँड नेता पुढे येईल अशी सुतराम शक्यता नाही.

● एकूणच अशी परिस्थिती असली तरी या रेल्वे भूसंपादन मावेजा महाघोटाळ्यातील एजंटांचा बाजार आष्टी आणि परळीमधून कधीच उठला असल्याने यांची आता पंचाईत होऊन बसली आहे.

● दरम्यान या एजंट लोकांची केविलवाणी परिस्थिती झाली असून आमचे आष्टी आणि परळीच्या नेत्यांकडे आजही तेवढेच वजन असल्याचा आव आणित फिरत आहेत, असे त्यांच्याच संपर्कात असलेल्या लोकांनी दैनिक वास्तवशी बोलताना सांगितले.

## आयशरची दुचाकीला धडक : दोन ठार, एक जखमी

**➤ कन्नड : प्रतिनिधी**

कन्नड–पिशोर रोडवरील चिंचबारी परिसरात भरधाव आयशरने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत दोन जणांचा मृत्यू तर एक जण जखमी झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवार (१० मार्च) रोजी दुपारी सुमारे दोन वाजेच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, कन्नड तालुक्यातील निंभोरा येथील तीन तरुण एमएच २० डीएक्स २८२१ क्रमांकाच्या सिटी हंड्रेड दुचाकीने कन्नडहून निंभोरा येथे जात होते. यावेळी चिंचबारीजवळ समोरून पिशोरकडून कन्नडकडे भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच १५ जीव्ही १०९२ क्रमांकाच्या आयशरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील तिघेही गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने जखमींना कन्नड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. रूखसार खान








यांनी तपासून संदीप उर्फ मच्छू कैलास सोनवणे (वय २५) यांना मृत घोषित केले. अपघातात जखमी झालेल्या धर्मा किसन सोनवणे (वय ३५) आणि परमेश्वर सीताराम डीघोळे (वय २७) यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले. त्यापैकी धर्मा सोनवणे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले होते; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तर परमेश्वर डीघोळे यांच्यावर कन्नड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी आयशर चालकाविरुद्ध कन्नड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस निरीक्षक रंगराव सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक तिलोकचंद पवार पुढील तपास करत आहेत.

## मंगलाताई सोळंके कै. अ‍ॅड. सुधाकरराव देशमुख स्मृती पुरस्काराने होणार सन्मानित

**➤ माजलगाव : प्रतिनिधी**

येथील ज्येष्ठ विधिज्ञ कै. अ‍ॅड. सुधाकरराव देशमुख स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने कै. अ‍ॅड. देशमुख यांच्या २९व्या स्मृतिदिना निमित्ताने देण्यात येणारा कै. अ‍ॅड. सुधाकरराव देशमुख स्मृती पुरस्कार माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांना 'स्मृतिगंध' या कार्यक्रमात प्रदान केला जाणार आहे. कै. सुधाकरराव देशमुख स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने मागील २९ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम तसेच आरोग्य शिबिराचेही आयोजन केले जाते. तसेच माजलगावसह बीडच्या भूमीत घडलेल्या आणि आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक मिळवलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरवही स्मृती पुरस्कार प्रदान करून केला जातो.

यंदा या पुरस्कारासाठी आपल्या कार्यशैलीतून माजलगाव सारख्या ग्रामीण भागात शैक्षणिक, सामाजिक, सहकार आणि महिला सबलीकरणाच्या क्षेत्रात



उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांना 'स्मृतिगंध' या विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. बुधवार दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ५ :३० वाजता अनंत भालेराव सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने अ‍ॅड. सुलभाताई देशमुख, नगरसेवक डॉ. सचिन देशमुख, डॉ. रोहिणी देशमुख यांच्यासह सर्व सदस्यांनी केले आहे.

### माहिती अधिकार प्रथम अपील निर्णय न देणे आंगलट

## विस्तार अधिकारी पी. बी. शाहिर अखेर निलंबीत

**भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अशोक कातखडे यांच्या तक्रारीची गंभीर दखल**

**बीड : प्रतिनिधी**

पंचायत समिती शिरूर (का.) येथील विस्तार अधिकारी (पंचायत) श्री. शाहीर पी. बी. यांच्यावर शासकीय कामकाजात सातत्याने निष्काळजीपणा, कार्यालयात विनापरवानगी अनुपस्थित राहणे तसेच वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशांकडे दुर्लक्ष केल्याच्या कारणावरून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. जितीन रहमान साहेब यांच्या आदेशानुसार क्र. संकीर्ण पं. चौकशी/२०२६ नं. ००९६ दि. १० मार्च २०२६ रोजी हा आदेश जारी करण्यात आला आहे. आदेशानुसार, संबंधित अधिकारी कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसून कोणतीही परवानगी न घेता वारंवार गैरहजर राहत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या संदर्भात त्यांना अनेक वेळा तोंडी तसेच लेखी सूचना देण्यात आल्या होत्या; मात्र त्या सूचनांकडे दुर्लक्ष करून गैरहजेरीचे प्रकार कायम राहिल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच ग्रामपंचायतींकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी, पत्रव्यवहार, माहिती अधिकारांतर्गत आलेली पत्रे तसेच अपील प्रकरणे यांकडेही त्यांनी अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून



अशोक कातखडे

आलेल्या पत्रांवर आवश्यक ती कार्यवाही न करणे तसेच वरिष्ठांनी मागविलेली माहिती विहीत मुदतीत सादर न करणे अशा बाबींचीही नोंद आदेशात करण्यात आली आहे. यामध्ये विशेषत: स्मशानभूमी संदर्भातील माहिती मा. विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करणे आवश्यक असतानाही ती माहिती वेळेत उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत किमान २० टक्के ग्रामपंचायतींच्या वेबसाईट तयार करणे अपेक्षित असताना त्यासंदर्भातील सद्यस्थितीचा गुणांकन तक्ता, गॅप फिलिंगची माहिती तसेच स्वतंत्र आराखडा तयार करून मंत्रीस्तरावर व जिल्हास्तरावर व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आढावा सादर करणे अपेक्षित होते; मात्र त्याबाबतही आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतींविषयी येणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करून चौकशी अहवाल सादर करणे ही जबाबदारी असतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून त्याबाबत कार्यवाही झालेली नाही. तसेच निमगाव (मा), ता. शिरूर (का.), जि. बीड येथील रहिवासी श्री. अशोक महादेव कातखडे यांनी २४ डिसेंबर २०२५ रोजी केलेल्या अर्जाद्वारे कळविल्यानुसार, ● पान २ वर...

## पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केली सिंदखेड पोलीस ठाण्याच्या कामकाजाची तपासणी

**➤ माहूर : जावेद शेख**

नांदेड परीक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक (डीआयजी) शहाजी उमाप व जिल्हापोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी वार्षिक तपासणीच्या निमित्ताने माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलीस ठाण्यास भेट देत पोलीस ठाण्याच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी सिंदखेड पोलीस ठाण्याच्या वतीने त्यांना मानवंदना देऊन स्वागत करण्यात आले.

यानंतर पोलीस पाटील संघटनेचे तंटामुक्ती समितीचे पदाधिकारी, महिला दक्षता समिती, पत्रकार तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. या वार्षिक आढावा तपासणी दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश



जाधवर यांनी सिंदखेड पोलीस ठाण्यातील विविध कामांचा आढावा मांडत प्रस्तावना सादर केली,

यावेळी डीआयजी शहाजी उमाप यांच्या हस्ते आजी माजी पोलीस पाटील, व पोलीस कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आले. त्यानंतर डीआयजी शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलीस ठाणे परिसराची सखोल पाहणी करत क्राईम रेकॉर्ड, गोपनीय नोंदी, मुद्देमाल कक्ष तसेच इतर प्रशासकीय नोंदींची तपासणी केली. यावेळी सिंदखेड पोलीस ठाण्याची कामगिरी समाधानकारक असल्याचे सांगत त्यांनी पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच पोलीस पाटील, तंटामुक्ती समितीचे पदाधिकारी, पत्रकार आणि नागरिकांशी संवाद साधत ● पान २ वर...




## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

# “रमजान : केवळ उपवास नव्हे, आत्मशुद्धी आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश”

**पवित्र रमजान महिन्याचे खरे महत्तव, त्यामागील आध्यात्मिक उद्देश आणि आजच्या काळात त्याच्याभोवती निर्माण झालेल्या दिखाऊपणावर भाष्य करणारा चिंतनपर लेख.**



विशेष


**डॉ. गुलाब शेख**
●नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणी

आजच्या काळात अनेकदा असे दिसून येते की कोणत्याही पवित्र गोष्टीचा मूळ उद्देश बाजूला पडतो आणि त्याभोवती निर्माण झालेला दिखावा व चकाकी अधिक महत्त्वाची ठरते. जेव्हा बाह्य आडंबर मनावर प्रभाव टाकू लागते, तेव्हा सत्य, विवेक आणि सत्व या मूल्यांची तीव्रता कमी होऊन केवळ भपकेबाजपणा मोठ्या दिमाखात उभा राहतो.

इस्लाम धर्मातील रमजान हा महिना अत्यंत पवित्र मानला जातो. हा केवळ उपवासाचा काळ नसून आत्मशुद्धी, संयम, आत्मपरीक्षण आणि मानवतेच्या सेवेसाठी स्वत:ला समर्पित करण्याचा काळ आहे. या महिन्यात माणसाने आपल्या अंतर्मनाशी संवाद साधत स्वत:तील उणिवा ओळखून त्यावर काम करणे अपेक्षित असते.

रमजानचे महत्त्व यासाठीही विशेष आहे की याच महिन्यात प्रेषित मुहम्मद (स.) यांना अल्लाहकडून कुरआनचे पहिले ज्ञान प्राप्त झाले. कुरआन हे मानवजातीसाठी मार्गदर्शक मानले जाते. त्यामुळे या महिन्यात कुरआन पठण, नमाज आणि अल्लाहच्या स्मरणाला विशेष महत्त्व दिले जाते.

उपवास म्हणजे केवळ अन्न आणि पाण्याचा त्याग नव्हे. खरे तर डोळे, जीभ आणि मनावर नियंत्रण ठेवणे ही त्यामागील खरी शिकवण आहे. खोटे बोलणे, वाईट वर्तन किंवा अनैतिक कृती केल्यास उपवासाचे आध्यात्मिक मूल्य कमी होते. म्हणून रमजान हा आत्मसंयम आणि नैतिकतेचा सराव करण्याचा काळ आहे.

या महिन्यात जकात आणि सदका या दानधर्माला विशेष महत्त्व दिले जाते. समाजातील गरजू, गरीब आणि वंचित घटकांना मदत करून सामाजिक समता आणि बंधुभाव वाढवणे हा त्यामागील उद्देश आहे. उपवासामुळे भूक आणि कष्टांची जाणीव अधिक तीव्र होते आणि त्यामुळे इतरांच्या वेदनांबद्दल सहानुभूती निर्माण होते.

मात्र आजच्या काळात रमजान अनेकदा केवळ कार्यक्रम, इफ्तार पार्ट्या आणि राजकीय शक्तिप्रदर्शनाचे साधन बनत असल्याचे दिसते. विविध राजकीय छत्रछायेखाली आयोजित होणाऱ्या इफ्तार समारंभांमधून सामाजिक किंवा आध्यात्मिक लाभापेक्षा बाह्य प्रदर्शनाला अधिक महत्त्व दिले जात असल्याची भावना निर्माण होते.

खरंतर रमजान हा स्वत:मध्ये बदल घडवण्याचा महिना आहे.

माणसाने आपल्या कमकुवत बाजूंना ओळखून त्या सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नमाज जितक्या कटाक्षाने पाळली जाते, तितक्याच काटेकोरपणे आपल्या वर्तनातही प्रामाणिकपणा आणि शिस्त दिसली पाहिजे

अल्लाहवरील दृढ विश्वास ठेवून एकता, प्रेम, बंधुत्व आणि सर्वसमावेशकतेचा मार्ग स्वीकारणे हीच रमजानची खरी शिकवण आहे. या पवित्र महिन्यात केलेले आत्मपरीक्षण आणि चांगले संकल्प जर दैनंदिन जीवनात उतरले, तर समाजात अधिक शांतता, समता आणि मानवतेची जाणीव निर्माण होऊ शकते.

### महत्वाचे ठळक मुद्दे

- रमजान हा केवळ उपवासाचा नव्हे तर आत्मशुद्धी आणि संयमाचा महिना आहे.
- या महिन्यात कुरआनचे अवतरण झाल्याने त्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे.
- उपवास म्हणजे फक्त अन्नत्याग नाही; विचार, वर्तन आणि भाषेवर नियंत्रण ठेवणेही आवश्यक आहे.
- जकात आणि सदका देऊन समाजातील गरजूंची मदत करणे ही महत्त्वाची जबाबदारी आहे.
- रमजानचा खरा उद्देश आत्मपरीक्षण, सुधारणा आणि मानवतेची सेवा हा आहे.
- इफ्तार पार्ट्यांच्या दिखाव्यापेक्षा समाजहिताच्या कार्यांवर अधिक भर देण्याची गरज आहे.

## माहिती अधिकार प्रथम अपील निर्णय न देणे आंगलट विस्तार अधिकारी पी. बी. शाहिर अखेर निलंबीत

●पान १ वरून... माहिती अधिकार कायद्यांतर्गत २८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रथम अपील प्रकरणात सुनावणी घेण्यात आली होती; तथापि त्या संदर्भातील अंतिम निर्णय अद्याप देण्यात आलेला नसल्याची बाबही आदेशात नमूद करण्यात आली आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता, कार्यालयात विनापरवानगी गैरहजर राहणे, आवश्यक माहिती वेळेत सादर न करणे तसेच शासकीय कामकाजात निष्काळजीपणा करणे ही कृती महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग करणारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्याचा आदेश देण्यात आला आहे.

दरम्यान, निलंबन कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील नियम ६८ अन्वये संबंधित अधिकाऱ्यास निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहणार आहे. निलंबन काळात त्यांचे मुख्यालय पंचायत समिती आष्टी येथे राहील व गटविकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच निलंबन काळात खाजगी नोकरी किंवा उद्योगधंदा करण्यास मनाई करण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन झाल्यास स्वतंत्र कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय पंचायत समिती आष्टीचे गटविकास अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्याचे उपस्थिती प्रमाणपत्र दिल्यानंतरच निर्वाह वेतन अदा करण्यात यावे, तसेच या आदेशाची नोंद संबंधितांच्या मूळ सेवा पुस्तिकेत करण्यात यावी, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. मुजोरगिरी करणारे अधिकरी व कर्मचारी यांना मोठी चपराक बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

# प्रिंटिंगच्या शोधाएवढाच ए.आय तंत्रज्ञानाचा शोधही मोठा - ज्येष्ठ पत्रकार राजीव खांडेकर

**● आयटी क्षेत्रात तरूणांना चांगली संधी - रावसाहेब घुगे ● अंबाजोगाईत वार्ता समुहाचा वर्धापन दिन व पुरस्कार वितरण सोहळा**






**अंबाजोगाई / प्रतिनिधी :**
प्रिंटिंगचा शोध जेवढा मोठा तितकाच ए.आय तंत्रज्ञानाचा मोठा शोध असल्याचे मत एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांनी व्यक्त केले. आगामी काळात याला महत्व असणार आहे, पण त्याचे दुष्परिणाम हे गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आयटी क्षेत्रात तरूणांना चांगली संधी आहे. त्यामुळे कौशल्याचा वापर करून या क्षेत्रात आपल्याला झेप घेता येत असल्याचे बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे यांनी सांगितले. दोन्ही मान्यवर अंबाजोगाई येथील दैनिक वार्ताच्या वर्धापन दिनानिमित्त बोलत होते. अंबाजोगाई शहरातील दैनिक वार्ता समुहाचा वर्धापन दिन व पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या थाटात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष तथा अंबाजोगाई पिपल्स बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी हे होते. तर प्रमुख आर्कषण म्हणून एबीपी माझा व एबीपी न्युज हिंदीचे मुख्य संपादक राजीव खांडेकर, संगमनेर (जि. अहिल्यानगर) येथील बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणून परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी, धारूरचे नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, सौ. जानव्हीताई राजीव खांडेकर, गंगामाऊली शुगरचे व्हाईस चेअरमन हणमंतराव काका मोरे, आयएमए अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. राहुल धाकडे आदी मान्यवर उपस्थित होते. तर व्यासपीठावर नगरभूषण पुरस्कार प्राप्त जळगावचे अप्पर पोलिस अधिक्षक अशोकराव नखाते, सदभावना पुरस्कार प्राप्त गौतमचंद सोळंकी, युवा गौरव पुरस्कार प्राप्त पुणे येथील युवा उद्योजक सुशिल सुरेशराव गाडवे, सेवागौरव सन्मान प्राप्त अंबाजोगाईचे उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांच्यासह दैनिक वार्ता समुहाचे संपादक परमेश्वर गित्ते यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते द्रोपतीबाई भगवानराव गित्ते यांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार, अंबाजोगाई शहरातील कला प्रेमी व साहित्यप्रेमी स्व. भगवानराव बप्पा शिंदे, पत्रकार मित्र नागनाथ वारद व परिसरातील दरम्यानच्या काळात निधन पावलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संपादक परमेश्वर गित्ते यांनी सांगितले की, अंबाजोगाई शहरातील जे वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे व्यक्तिमत्व आहेत. ज्यांनी अंबाजोगाई शहराच्या बाहेर म्हणजे भारतात किंवा देशाबाहेर उत्कृष्ट काम करून या शहराचा लौकिक वाढविला आहे. अशांचा वेगवेगळे पुरस्कार देवून सन्मान करण्याची परंपरा गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. येणाऱ्या काळात देशातील व राज्यातील मान्यवर वक्त्यांनी निमंत्रित करून त्यांचे अनमोल विचार नव्या पिढीला पोहोचविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू त्यासाठी जे मान्यवर उपस्थित राहतील त्यांच्यासाठी राजीव खांडेकर यांनी शिफारस करावी. अशी अपेक्षा व्यक्त केली. तर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेले एबीपी माझा व एबीपी न्युज हिंदीचे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांनी बोलताना सांगितले. की, बीड जिल्हा हा माझ्यासाठी आदराचे स्थान आहे. कारण, याच जिल्ह्याने मला धर्मपत्नी दिली आहे. त्यामुळे या जिल्ह्याशी माझी जवळीकता आहे. अंबाजोगाई शहर हे कोहीनूर हिऱ्यांची खान आहे. आज मला इथे सकारात्मकता जाणवत आहे. आज इथे वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये काम करणारे मंडळी आहेत. इथे फेटा बांधणारे पण, बुमराह सारखी नजर रोखून फेटा बांधल्याचे ते म्हणाले. आजच्या प्रश्नांची सोडवणूक होऊ शकते अशा मंडळींना ऐकण्याची संधी आज परमेश्वर गित्ते यांच्यामुळे भेटल्याचे खांडेकर म्हणाले. आज अनेक प्रकारचे प्रश्न आहेत. येणाऱ्या काळामध्ये असणार आहेत. ए.आय आता महत्वाचा आहे, आपण त्याला टाळू शकत नाही असे खांडेकर म्हणाले. देवांग मेहता यांनी आधीच सांगितले होते की, मोबाईल आपल्या आयुष्याचा भाग बनणार आहे. प्रिंटिंगचा शोध जेवढा मोठा होता तितकाच मोठा शोध ए.आयचा आहे. गुगलने बारामतीत शेतीवर प्रयोग केले. त्यांनी शेतात ए.आय चा वापर करण्यास सांगितले. शेतात ए.आयचा वापर होऊ लागला आहे. वाऱ्याची दिशा, पिकावरील कीड, पिकाला किती पाणी हे मोबाईलवर समजणार आहे. एकरी शंभर टन ऊसाचे उत्पन्न होणार असल्याचे खांडेकर म्हणाले. ए.आयचे दुष्परिणाम देखील होणार आहेत. यामुळं नोकऱ्यावर परिमाण होणार आहे. माणसाची कामं यंत्र करायला लागली तर परिस्थिती बदलणार असल्याचे राजीव खांडेकर म्हणाले. अर्जून देशपांडे यांचा कट्टा पहा तो २५ वर्षांचा आहे. त्याने जेनरिक औषधांवर काम सुरू केलं. अर्जुनने जेनरिक आधार नांवाची कंपनी सुरू केली. रतन टाटाने याची बातमी वाचली. त्यानंतर ते त्याचे मेंटॉर बनले. त्यांची १६०० मेडिकल होती. त्याचं कौतुक पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही केलं आहे. स्ट्रॉंग आयडिया असल्यास हे शक्य असल्याचे खांडेकर म्हणाले. संजू राठोड यांचे गुलाबी साडी गाणं दोन वर्षे टॉप फिफ्टी मध्ये होतं. म्हशी घेऊन दूध विकायचं स्वप्न होतं सोबत गाणं लिहायचं आणि म्हणायचा छंद होता. त्यांच्या भावाने म्युझिक दिलं त्याच्या गाण्याला यूट्यूबकडून पैसे मिळाले. गुलाबी साडीचा चमत्कार. तो स्टेशनवर राहिलेला मुलगा गाणे गाऊ लागला. तुम्ही पॉझिटिव्हली विचार केला तर ते सार्थकी लागतं. त्याला अनंत अंबानींच्या लग्नाचा आमंत्रण मिळालं असे खांडेकर म्हणाले. कॉम्प्युटर आल्यावर कम्प्युटरवरच्या कुंडल्या विकायला सुरूवात झाली. आपण जसे मोबाईल वापरतो. तसे जगात इतर लोक मोबाईल वापरत नाहीत.

मला विदेशात मोबाईल वापरणारे लोक सापडले ते ९० टक्के भारतातलेच होते. मनोरंजन स्थायीभाव झालेला आहे. मज्जा करणं स्वभाव झालाय, सण कमी होते म्हणून मदर्स डे, फादर डे आपण करीत आहोत. मनाचे रंजन करण्यात आपण धन्यता मानत आहोत असे खांडेकर म्हणाले. मोबाईलबद्दल मुलांना शिकविण्यापेक्षा आई-बापाला शिकवले पाहिजे. आपल्याकडे आई-बाप होण्यासाठी क्वॉलिफिकेशन नाही. त्यामुळं अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण झाले आहेत. अंबाजोगाईत हे प्रश्न कमी असतील अशी मी अपेक्षा करतो असे खांडेकर म्हणाले. तर कार्यक्रमाचे दुसरे आकर्षण असलेले बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे बोलताना म्हणाले की, अत्यंत प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत गावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेपासून शिक्षण घेत मुंबई सारख्या ठिकाणी उच्च शिक्षण घेतले. या प्रवासात अनेक प्रवासी भेटले. ज्याचा परिणाम माझ्या स्वत:च्या आयुष्यावर आणि व्यक्तिमत्वावर झाला आणि प्रत्येक ठिकाणी प्रत्येक माणसांकडून वेगवेगळे शिकायला मिळाले. आज समाजात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात माजलेला आहे. शासनाचा प्रत्येक विभाग हा भ्रष्टाचाराने बरबटलेला आहे. व्यवस्था बदलण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. जो कोणी माझ्या सारखा पुढे येईल. त्याचे हजार दुश्मन तयार होतात. एक काम दोन दिवसांत होते. आणि तेच काम चार महिन्यांत सुद्धा होत नाही. ही मोठी शोकांतिका आहे. सामाजिक जगणे आणि वास्तविकता यात तफावत असल्याचे सांगत आपण संगमनेर तालुक्यातील पारेगाव खुर्द या ठिकाणी बाप नांवाची आयटी कंपनी स्थापन करून त्या ठिकाणी गोर-गरीबांच्या व सर्व सामान्यांच्या मुलांना स्वॉफ्टवेअर डेव्हलपर्स कंपनीमध्ये नौकरीची व शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. ही कंपनी वशिल्यावर किंवा ओळखीवर चालणारी नाही. तर ही कंपनी माईंड गेमवर चालणारी कंपनी आहे. त्यामुळे प्रत्येकाला या ठिकाणी आपले कौशल्य व वेगळेपणा दाखवावा लागेल. तरच भविष्याची वाटचाल सुकर होईल.

आयटी क्षेत्रात भरपूर संधी आहेत. ज्यांना त्या संधीचे सोने करता येईल. तोच पुढे जाणार असल्याचे रावसाहेब घुगे यांनी सांगितले. अंबाजोगाई शहरामध्ये दैनिक वार्ता समुहाने समाजातील वेगवेगळ्या घटकांना सामावून घेत त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान केला आहे. ही अभिमानास्पद बाब आहे. वार्ता समुहामुळे अंबाजोगाई शहर व परिसरातील हजारो तरूणांशी संवाद साधण्याचे संधी आपणांस मिळाली असल्याचे घुगे यांनी सांगितले. तर कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी म्हणाले की, अंबाजोगाई शहरामध्ये वार्ता समुहाने सातत्याने सकारात्मक बाबींना प्राधान्य देवून त्यांचा सन्मान सत्कार केला आहे. अंबाजोगाई शहरामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे मंडळी आहे. त्या मंडळींच्या कामाचे कौतुक करून त्यांचे काम व त्यांची तपश्चर्या समाजासमोर मांडण्याचे काम केले आहे.

या शहराने आमच्या परिवारावर अतोनात प्रेम केले असून त्याची उतराई होणे शक्य नसल्याचे मोदी यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार गोविंद महाराज केंद्रे यांनी मानले. उपस्थितांचे सहर्ष स्वागत गायक सुभाष शेप व गायिका मयुरी मजगे यांच्या संगीत संचाने केली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ, अ.भा. मराठी पत्रकार परिषद, शाखा अंबाजोगाई, पत्रकार संघ अंबाजोगाई, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, शाखा अंबाजोगाई, अ.भा. मराठी डिजीटल पत्रकार संघ, अंबाजोगाई, गुड मॉर्निंग ग्रुप, अंबाजोगाई, व्हाईस ऑफ मिडीया शाखा अंबाजोगाईच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमासाठी अंबाजोगाई, परळी, धारूर, केज व पंचक्रोशीतून विविध क्षेत्रातील मान्यवर, असंख्य नागरिक, बंधू-भगिनी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टायर फुटला अन् बस पेटली? सुदैवाने मोठी दुर्घटना टळली



➤ **कन्नड : प्रतिनिधी**
शहादा आगाराची शहादा–छत्रपती संभाजीनगर मार्गावरील खाजगी बस मंगळवारी (दि.१० मार्च) दुपारी कन्नडजवळील अधिकृत हॉटेल आम्रपाली येथे थांबलेली असताना अचानक पेट घेतल्याची घटना घडली. टायर फुटल्याचा आवाज झाल्यानंतर काही क्षणातच बसला आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने चालक व वाहक यांनी तत्परता दाखवत सर्व प्रवाशांना तात्काळ बसमधून खाली उतरविल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.
मिळालेल्या माहितीनुसार, शहादा आगाराची बस (क्र. MH-15 JC-5493) शहादा ते छत्रपती संभाजीनगर या मार्गावर धावत होती. दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास बस अधिकृत हॉटेल आम्रपाली येथे थांबली असताना प्रवासी खाली उतरत होते. त्याचवेळी वाहक बाजूच्या मागील टायरचा जोरदार स्फोट झाल्याचा आवाज आला आणि काही क्षणातच बसला आग लागली.

घटनेनंतर चालक वसंत मगन पाटील आणि वाहक राजेंद्र चेतन शिरसाठ यांनी तातडीने प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यानंतर चालक, वाहक आणि हॉटेल मालक यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला; मात्र आग वेगाने पसरल्याने बस पूर्णपणे जळून खाक झाली. या घटनेत सुदैवाने कोणत्याही प्रवाशाला, चालक किंवा वाहकाला दुखापत झाली नाही. मात्र बसमधील काही प्रवाशांचे सामान आणि कागदपत्रे आगीत जळून नष्ट झाल्याची माहिती मिळाली आहे. घटनेनंतर अग्निशमन दलाच्या वाहनाने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. या प्रकरणी शहादा आगाराच्या आगार व्यवस्थापक स्वाती बाखडे, बसस्थानक प्रमुख संघर्ष पगारे व सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक बालाजी तोटवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. तसेच यंत्र अभियंता स्वप्नील धनाड, सुरक्षा व दक्षता अधिकारी भोसले व प्रादेशिक सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक पारखे यांनी बसची पाहणी करून घटनेचा आढावा घेतला.

## पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केली

●पान १ वरून... परिसरातील कायदा व सुव्यवस्था, स्थानिक समस्या आणि नागरिकांच्या अडी अडचणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलीय. यावेळी सिंदखेड पोलीस ठाण्याच्या वतीने सिंदखेड पोलीस ठाण्याअंतर्गत येत असलेल्या वाई बाजार येथील पोलीस मदत केंद्र येथे नव्याने उभारण्यात आलेल्या बॅडमिंटनचे, हॉलि्बॉल, क्रिकेट ग्राऊन्ड चे उद्घाटनही डीआयजी शहाजी उमाप यांच्या व पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी भोकरचे अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, माहूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे, सिंदखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर, पोलीस कर्मचारी, होमगार्ड तसेच परिसरातील पोलीस पाटील तंटामुक्ती अध्यक्ष, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष



# माजलगावात सराफ सुवर्णकार असोसिएशनचा भव्य मार्गदर्शन मेळावा

## पोलीस अधिकारी यांचा कर्तव्यदक्षता आणि जनसेवा गौरव सोहळ्याचे आयोजन

➤ **माजलगाव / प्रतिनिधी** : सराफ सुवर्णकार समाजातील व्यापारी व कारागिरांना कायदेशीर मार्गदर्शन मिळावे तसेच कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने सराफ सुवर्णकार असोसिएशन, माजलगाव यांच्या वतीने IPC 411 / BNS 317 संदर्भात भव्य मार्गदर्शन मेळावा व "कर्तव्यदक्षता आणि जनसेवा गौरव सोहळा" आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता शाहू नगर, माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक नवनित कांवत व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड तसेच त्यांच्या संपूर्ण पथकाचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगावचे आमदार प्रकाश (दादा) सोळंके राहणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजेशजी रोकडे (चेअरमन – ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिल), तर

यावेळी प्रमुख उपस्थितीत माजी आमदार राधाकृष्ण आण्णा होके, आ. विजयसिंह पंडित, ओमप्रकाश शेटे, मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, ग्रामीण पोलीस निरीक्षक बालक कोळी, शिवाजी रांजणव उमेश मोगरेकर तुकाराम येवले कल्याण आबुज पांडुरंग उगले प्रभाकर कुलथे यांच्यासह जिल्ह्यातील विविध व्यापारी संघटना व सुवर्णकार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तसेच सचिन अंबिलवादे, गणेश बेद्रे (सुवर्णकार फेडरेशन), माधव निर्मळ (उद्योजक, बीड), मंगेश लोळगे, आनंत दादा रुद्रवार, संतोष शेठ सोहनी आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. व कायदे सल्लागार अँड .दिपक देशमुख यांचे कायदेशीर मार्गदर्शन होणार आहे

या कार्यक्रमाचे आयोजन सराफ सुवर्णकार असोसिएशन माजलगावचे अध्यक्ष रामराजे रांजवण, सचिव गजानन बोकन, उपाध्यक्ष नारायण सातपुते यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

समस्त सराफ सुवर्णकार बांधवांनी या मार्गदर्शन मेळाव्यास उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.


वाचत रहा

ई पेपर वाचा

सांज दैनिक बीड. वास्तव

http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com


# सावित्रीमाईंच्या संघर्षाची जिवंत कहाणी; मेघना झुंझम यांच्या एकपात्री प्रयोगाने प्रेक्षक भारावले

## ➤ महिला दिनानिमित्त आयोजित 'खेळ पैठणी'च्या होम मिनिस्टर स्पर्धेत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग







➤ **आष्टी : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रेरणादायी सांस्कृतिक कार्यक्रमात 'मी तुमची सावित्रीबाई फुले' या प्रभावी एकपात्री प्रयोगाने उपस्थितांच्या मनावर अधिराज्य गाजवले. या प्रयोगात सौ. मेघना झुंझम (भिंबरपाटील) यांनी आपल्या दमदार अभिनयातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाची प्रेरणादायी गाथा सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.

आष्टी पंचायत समितीच्या प्रांगणात सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आष्टी तालुका दूध संघ, आष्टी नगरपंचायत कार्यालय, कासारी, मुर्शदपुर, शिंदेवाडी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम पार पडला. मुंबई महानंद संचालिका सौ. प्राजक्ता ताई सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. परिसरातील महिलांसाठी हा कार्यक्रम प्रेरणा, मनोरंजन आणि समाजप्रबोधनाचा संगम ठरला.

एकपात्री प्रयोगाद्वारे सौ. मेघना झुंझम यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील संघर्ष, स्त्री शिक्षणासाठी केलेले महान कार्य आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य अत्यंत प्रभावीपणे सादर केले. पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करणाऱ्या सावित्रीमाईंचा इतिहास, समाजाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी केलेली लढाई आणि स्त्री शिक्षणाचा लावलेला दीप या प्रयोगातून जिवंत झाला. या सादरीकरणाने उपस्थितांना कधी भावूक केले तर कधी हसवले. स्त्री–पुरुष समानता, स्त्रीशक्ती, धाडस आणि शिक्षणाचे महत्त्व यांचा जागर या प्रयोगातून करण्यात आला. सावित्रीमाईंच्या कार्याची आठवण करून देत समाजात परिवर्तनाची प्रेरणा देणारा हा प्रयोग उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

यावेळी महिला दिनानिमित्त आयोजित 'खेळ पैठणी'च्या "होम मिनिस्टर" स्पर्धेत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित कार्यक्रमाचा मनमुराद आस्वाद घेतला.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे :

प्रथम – सुमित्रा संकेत गायकवाड (आकर्षक पैठणी व फ्रिज, सन्मानचिन्ह)
द्वितीय – ऋतुजा लोंढे (आकर्षक पैठणी व वॉशिंग मशीन, सन्मानचिन्ह)
तृतीय – मनीषा शेळके (आकर्षक पैठणी व ओव्हन, सन्मानचिन्ह)
उत्तेजनार्थ – संगीता हराळ (आकर्षक पैठणी व राईस कुकर, सन्मानचिन्ह)
पाचवा – योगिता रेडेकर (इंडक्शन शेगडी, सन्मानचिन्ह)
सहावा – रेश्मा शास्त्री (टेबल फॅन, सन्मानचिन्ह)
सातवा – इलेक्ट्रिक ब्लेंडर (सन्मानचिन्ह)
आठवा – संगीता साबळे (केतली, सन्मानचिन्ह),
नववा – ज्योती प्रविण पोकळे (इस्त्री, सन्मानचिन्ह),
दहावा – जया वारंगुळे (टिफिन बॉक्स, सन्मानचिन्ह) देऊन विजेत्या महिलांना सन्मानीत करण्यात आले.


यावेळी आष्टी तालुका दूध संघ, आष्टी नगरपंचायत कार्यालय, कासारी, मुर्शदपुर, शिंदेवाडी ग्रामपंचायत पदाधिकारी, पत्रकार, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# जात प्रमाणपत्राची मागणी शोले स्टाइलने आंदोलन; माजलगावात घटना, प्रशासनाकडून तरूणाची समजूत

**माजलगाव** : जात प्रमाणपत्र मिळत नसल्याने एका तरुणाने माजलगाव शहरात मोबाईल कंपनीच्या टॉवरवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन केल्याची घटना मंगळवारी घडली. या प्रकारामुळे पोलीस व महसूल प्रशासनाची धावपळ उडाली.

धारूर तालुक्यातील धुनकवड येथील हनुमंत जमादार (३२) हा महादेव कोळी समाजाचा तरुण असून जात प्रमाणपत्र मिळावे यासाठी त्याने अर्ज दिलेला आहे मात्र त्याला अनेक दिवसांपासून प्रमाणपत्र मिळालेले नाही. प्रमाणपत्र देण्याच्या मागणीसाठी मंगळवारी तो माजलगाव शहरातील सन्मित्र कॉलनी परिसरातील मोबाईल कंपनीच्या टॉवरवर चढला. टॉवरच्या उंच भागावर बसून त्याने प्रशासनाविरोधात तीन्न भूमिका घेतली.

'जोपर्यंत मला जात प्रमाणपत्र दिले जात नाही, तोपर्यंत मी खाली उतरणार नाही,' असा पवित्रा आंदोलनकर्त्याने घेतला आहे. कोणी जबरदस्तीने खाली – आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा जवळ येण्याचा प्रयत्न केल्यास टॉवरवरून उडी मारून आत्महत्या करीन, अशी धमकी त्याने दिल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. घटनेची माहिती मिळताच माजलगाव शहर पोलीस तसेच महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारीही घटनास्थळी पोहोचले. दरम्यान, टॉवरवर चढलेल्या तरुणामुळे परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांकडून खबरदारी घेतली जात आहे.





# संगीतातून आनंदाचा सेतू उभारणाऱ्या जया महाजन यांचा कॉसमॉस बँकेकडून गौरव

➤ **छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

कॉसमॉस को–ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या प्रसंगी बँकेचे डीजीएम अविनाशजी चव्हाण यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला. समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत प्रेरणादायी ठरणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. शिक्षण, सामाजिक कार्य, कला आणि सांस्कृतिक



क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या महिलांच्या




कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी संगीत क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या 'सिंग अलॉन्ग कराओके ग्रुप'च्या जया महाजन यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

संगीताच्या माध्यमातून विविध वयोगटातील लोकांना एकत्र आणत आनंदाची आणि उत्साहाची मैफल रंगविण्याचे कार्य त्या सातत्याने करत आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेकांना गाण्याचा आनंद अनुभवता येत असून, संगीताची आवड जोपासण्यासाठीही त्यांना प्रेरणा मिळत आहे.

डीजीएम अविनाशजी चव्हाण यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना महिलांच्या कर्तृत्वाचे कौतुक केले. समाजाच्या प्रगतीत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून विविध क्षेत्रांत त्या उल्लेखनीय कार्य करत आहेत. अशा कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात उपस्थितांनी सन्मानित महिलांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या सन्मान सोहळ्यामुळे महिलांच्या कार्याला प्रोत्साहन मिळण्याबरोबरच समाजात सकारात्मक संदेशही पोहोचला.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

# गॅस दरवाढीचा फटका; ग्रामीण भागात महिलांची पुन्हा चुलीकडे वाटचाल

## महिलांना पुन्हा पारंपरिक चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ







➤ पाचोड : प्रतिनिधी

जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचे गडद सावट आता सर्वसामान्यांच्या जीवनावर दिसू लागले आहे. या परिस्थितीचा थेट परिणाम घरगुती वापराच्या वस्तूंवर होत असून, घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात झालेल्या वाढीमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे मासिक बजेट कोलमडले आहे. वाढत्या महागाईमुळे आधीच त्रस्त असलेल्या नागरिकांना या दरवाढीचा मोठा फटका बसत आहे. विशेषत: ग्रामीण भागात या परिस्थितीचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत.

गॅस सिलेंडरच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे अनेक कुटुंबांना घरखर्चाचा ताळमेळ बसवणे कठीण झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक महिलांना पुन्हा पारंपरिक चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे. गॅस सिलेंडर महागल्यामुळे अनेक घरांमध्ये चुलीचा वापर वाढल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात दिसत आहे. लाकूडफाटा किंवा शेणकांड्यांच्या साहाय्याने स्वयंपाक करण्याची पद्धत पुन्हा सुरू होत असल्याचेही दिसून येत आहे. गॅसच्या वाढत्या किंमतीमुळे महिन्याचा खर्च सांभाळणे अधिक कठीण झाले आहे. आधीच अन्नधान्य, भाजीपाला आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या दरात वाढ झाली आहे. त्यातच गॅस सिलेंडर महाग झाल्यामुळे स्वयंपाकाचा खर्चही वाढला आहे. त्यामुळे अनेक महिलांना धुराचा त्रास सहन करत पुन्हा चुलीवर स्वयंपाक करावा लागत आहे. यामुळे आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गॅस सिलेंडरच्या वाढत्या किमतीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाने गॅसच्या दरांवर नियंत्रण आणावे आणि सर्वसामान्यांना दिलासा देणारे निर्णय घ्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर गॅस दरवाढीचा प्रश्न आता ग्रामीण कुटुंबांसाठी मोठी चिंता बनला आहे.

### गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्यांचा संताप :

● आधीच डाळी, तेल आणि भाज्यांचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यात आता गॅस सिलिंडर ६० रुपयांनी महागल्याने महिन्याचे गणित कसे जुळवायचे, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे," अशा संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहेत.

### अचानक वाढलेल्या या दरांमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण

● जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा फटका आता सर्वसामान्यांना बसत असून, व्यावसायिक गॅसनंतर घरगुती गॅसच्या दरातही वाढ झाली आहे. नवीन दराची अंमलबजावणी आजपासून सुरू करण्यात आली असून, बुकिंग केलेल्या ग्राहकांनाही वाढीव दरानेच पैसे मोजावे लागत आहेत. त्यामुळे अचानक वाढलेल्या या दरांमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## विशेष



## परमपूज्य गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त शुभेच्छा

माजलगाव : गुरुकृपा ऑफ इन्स्टिट्यूट, माजलगाव यांच्या वतीने परमपूज्य गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त महाआरोग्य व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.
या कार्यक्रमाचे उद्घाटन युवासंत चंद्रकांत (दादासाहेब) मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पत्रकार परमेश्वर सोळंके, बाळासाहेब आडागळे, अमर साळवे तसेच डॉ. यशवंतराजे भोसले यांच्या उपस्थितीत युवासंत दादासाहेब मोरे यांचा सत्कार करण्यात आला.
या उपक्रमामुळे अनेक नागरिकांना आरोग्य तपासणीचा लाभ मिळाला तसेच रक्तदानाबाबत जनजागृतीही झाली.

## जागतीक महिला दिनाचे औचित्य साधत क्रांतीपाजू सेवाभावी संस्थेने महिलांना घडवली अजंठा लेण्यांची सफर




पैठण / प्रतिनिधी :
क्रांतीपाजू बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने जागतिक महिला दिनाच्या औचित्याने बोराडे आई व घुले आई यांच्यासह उपस्थित सर्व महिला भगिनींचा येथोचित सन्मान करत त्यांचे हस्ते केक कापून महिला दिन साजरा करण्यात आला. तसेच महिला दिनाच्या निमित्ताने क्रांती पाजू बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने या महिलांना अनोखी भेट देत त्यांना जागतिक दर्जाच्या अजिंठा लेण्यांची सफर घडवून आणत या अजिंठा लेण्यांच्या इतिहास बाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर भोकरदन तालुक्यातील वाकडी कोकडी या गावात जाऊन महिलांचे उद्बोधन करण्यात आले. यादरम्यान ईश्वर बोराडे यांनी सर्व महिला भगिनींचे स्वागत केले. यावेळी कविता बोराडे अन्नपूर्णा यादव, मोहिनी साठे, अमृता साठे, प्राजक्ता घुले, नंदकिशोर साठे, प्रवीण घुले, राघो बोराडे, सुभाष राठोड यांच्यासह गावचे सरपंच उपसरपंच सदस आणि गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संस्थेच्या अध्यक्ष सुनीता राठोड यांनी मानले.

## शिक्षणासोबतच संस्कार देणारी श्री समर्थ इंग्लिश स्कूल - रमेश फपाळ





➤ माजलगाव : प्रतिनिधी

शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देणारी शाळा म्हणून श्री समर्थ इंग्लिश स्कूल अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. या शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी - प्रयत्न करत आहेत. त्यामुळेच कमी कालावधीत शाळेने नावलौकिक मिळवला आहे, असे प्रतिपादन शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ यांनी केले.

माजलगाव तालुक्यातील उमरी येथील श्री समर्थ इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ९ सोमवार रोजी रात्री ७ वा. मोठ्या उत्साहात - संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उमरी जिल्हा परिषद केंद्राचे केंद्रप्रमुख विठ्ठल आरबे, विजया अर्बन बँकेचे व्हाइस - चेअरमन आसाराम घायतिडक, - श्री समर्थ इंग्लिश स्कूलचे संचालक ज्ञानेश्वर घायतिडक तसेच पत्रकार वैजनाथ घायतिडक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात म ान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. लहानग्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, देशभक्तीपर गीत, नाटिका आणि सामाजिक संदेश देणारे कार्यक्रम यांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

या वेळी बोलताना विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच संस्कार आणि शिस्त जोपासणे गरजेचे असल्याचे सांगितले. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र असते. त्यामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे परस्पर सहकार्य महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांनी कार्यक्रमाला रंगत आणली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश कोरडे, वर्षा चोले, प्रमेश्वर कांबळे, राधा ज्ञानेश्वरी सुर्वे, पुजा गिरी, लक्ष्मी करे कर्मचारी व पालकांनी विशेष परिश्रम घेतले. या सर्व कार्यक्रम चे सुत्रसंचलन शाळेतील लहान मुलांनी केले. तर आभार ज्ञानेश्वरी सुरवसे यांनी मानले.

## ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विठ्ठलराव तिडके यांचा ७५ वा अमृत महोत्सव उत्साहात साजरा



➤ माजलगाव : प्रतिनिधी

माजलगाव येथील वकील संघाचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विठ्ठलराव तिडके यांचा ७५ वा अमृत महोत्सव माजलगाव वकील संघाच्या वतीने मंगळवार दि. १० मार्च रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी वकील संघातील अनेक वरिष्ठ विधिज्ञ उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान ॲड. एस.आर. शर्मा, ॲड. एम.ए. डोंगरदिवे, ॲड. बी.आर. डक, ॲड. एस.यू. सोळंके, ॲड. एन.आर. गोले आणि ॲड. बादाडे यांनी ॲड. तिडके यांच्या जीवनप्रवासावर व त्यांच्या विधी क्षेत्रातील योगदानावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वकील संघाचे सचिव ॲड. नारायण तेलगड यांनी केले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. मनसबदार होते.

या कार्यक्रमाला सिनियर ॲड. टी.एन. कोल्हे, ॲड. यू.डी. मोरे, ॲड. गवते, ॲड. सजगणे, ॲड. फपाळ, ॲड. विजय मस्के, ॲड. राऊत, ॲड. निंबाळकर, ॲड. राठोड, ॲड. आडे, ॲड. तिडके, ॲड. कुंभार, ॲड. गरड, ॲड. सोनवणे, ॲड. शिंदे, ॲड. होरमाळे, ॲड. खेत्री, ॲड. बोचरे, ॲड. कुलकर्णी, हिंगण यांच्यासह अनेक वकील उपस्थित होते.

### महत्वाचे ठळक मुद्दे

● ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विठ्ठलराव तिडके यांचा ७५ वा अमृत महोत्सव
● माजलगाव वकील संघातर्फे कार्यक्रमाचे आयोजन
● अनेक वरिष्ठ वकीलांनी व्यक्त केले मनोगत
● ॲड. नारायण तेलगड यांनी केले सूत्रसंचालन
● अध्यक्षस्थानी ॲड. मनसबदार

## कन्नड पंचायत समितीवर शिवसेना-भाजप युतीची निर्विवाद सत्ता

### शिवसेनेच्या सुप्रिया घुगे सभापती तर भाजपच्या माया सुराशे उपसभापती बिनविरोध



कन्नड / प्रतिनिधी :
कन्नड पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती पदासाठी मंगळवार (दि. १० मार्च) रोजी निवड प्रक्रिया पार पडली. विरोधकांकडून कोणताही उमेदवार अर्ज दाखल न झाल्याने दोन्ही पदांवर शिवसेना-भाजप युतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. सभापतीपदी शिवसेनेच्या सुप्रिया अनिल घुगे तर उपसभापतीपदी भाजपच्या माया ललित सुराशे यांची निवड झाली. मागील महिन्यात ९ फेब्रुवारी रोजी पंचायत समिती सदस्यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला होता. त्यानंतर सभापती व उपसभापती पदाच्या निवडीसाठी पंचायत समिती कार्यालयात ही प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत विरोधी पक्षाने उमेदवारी न दिल्यामुळे दोन्ही पदांची निवड बिनविरोध झाली.

निवड प्रक्रियेसाठी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी पिठासीन अधिकारी म्हणून कामकाज पाहिले. त्यांना नायब तहसीलदार प्रशांत काळे, गटविकास अधिकारी ओमप्रकाश रामावत, सहायक गटविकास अधिकारी विजयकुमार पंडित, तलाठी दिपक एरंडे, विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे व चव्हाण यांनी सहकार्य केले.

या प्रसंगी आमदार संजनाताई जाधव, जिल्हा परिषद सदस्य तथा भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. संजय गव्हाणे, जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, माजी सभापती आप्पाराव घुगे, किशोर आबा पवार, सुनिलभाऊ पवार, रावसाहेब पवार, रमेशसेठ जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. मनोज राठोड, उपसभापती जयेश बोरसे पाटील, खरेदी विक्री संघाचे सभापती ज्ञानेश्वर निकम पाटील, किशोर नागरे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक अब्दुल जावेद सेठ, डॉ. दिलीपसिंग परदेशी यांच्यासह पंचायत समिती सदस्य, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जागतिक महिला दिनानिमित्त

## अभिनेत्री मेघना झुझम पाटील यांचा पत्रकार संघाच्या वतीने सन्मान



➤ आष्टी : प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने प्रसिद्ध अभिनेत्री व प्रबोधनकार सौ. मेघना झुझम (भिंबरकर) पाटील यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

आष्टी येथील पंचायत समितीच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमात त्यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले.
महानंद मुंबईच्या संचालिका सौ. प्राजक्ताताई सुरेश धस यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार समीर शेख, जेष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, दीपक उंबरकर व जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय उपाध्यक्षा सुवर्णाताई गि-हे, सरपंच वंदनाताई गायकवाड, सरपंच शालिनीताई मुळे, माजी सरपंच आदिकाताई लोखंडे, तसेच मुर्शुदपूर ग्रामपंचायत सदस्या सौ. स्वप्ना अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते. तर आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा १२ मार्च रोजी नारी सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

## पैठण पं.स.सभापतीपदी वैशाली विनोद बोंबले यांची बिनविरोध निवड

### उपसभापतीपदी रांजणगाव खुरी गणातील संजय लघाने



➤ पैठण : पैठण पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेनेच्या वैशाली विनोद बोंबले तर उपसभापतीपदी संजय लघाने यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या पंचायत समिती निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) पक्षाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत खा. संदीपान भुमरे यांचे कुशल मार्गदर्शन व पैठणचे आ. विलास बापू भुमरे यांच्या नेतृत्वाखाली घवघवीत विजय मिळवला होता.

पैठण पंचायत समितीचे सभापतीपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी सुटल्याने पाचोड, ढोरकीन, लोहगाव, चितेगाव, चांगतपुरी, आडुळ, निलजगाव व बालानगर या गणांमधून विजयी झालेल्या महिला सदस्यांची नावे चर्चेत होती. परंतु मंगळवारी पैठण पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सभापती व उपसभापती निवड प्रक्रियेत सभापतीपदी ढोरकीन गणातील पंचायत समिती सदस्या वैशाली विनोद बोंबले यांची तर उपसभापतीपदी रांजणगाव खुरी गणातील संजय अशोक लघाने यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सदर निवड प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी प्रवीण फुलारी, नायब तहसीलदार कैलास बहुरे व नायब तहसीलदार वैशाली कांबळे यांनी पार पाडली. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजू नाना भुमरे, दुध संघाचे नंदलाल काळे, तालुका प्रमुख आण्णासाहेब लबडे, नाथ संस्थानचे विश्वस्त दादा बारे, विनोद बोंबले, नामदेव खरात, सतीश आंधळे, शहादेव लोहारे यांच्यासह सर्व नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य आणि शिवसेना पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## नॅनो-कॉम्पोझिट मटेरियल्स संशोधनासाठी विजेंद्र चौधरी यांना आयसीटी, मुंबईकडून पीएचडी




➤ माजलगाव : प्रतिनिधी

इंजिनिअरिंग क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत विजेंद्र राजेंद्र चौधरी यांनी नॅनो-कॉम्पोझिट मटेरियल्स या विषयावर संशोधन पूर्ण करून मुंबई येथील प्रतिष्ठित इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) मधून इंजिनिअरिंग शाखेत पीएचडी पदवी प्राप्त केली आहे.

त्यांच्या संशोधनामध्ये नॅनो-पार्टिकल्सचा वापर करून पॉलिमर मटेरियल्सच्या मेकॅनिकल तसेच थर्मल गुणधर्मांमध्ये सुधारणा करण्यावर सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनामुळे ॲडव्हान्स्ड मटेरियल्स, पॉलिमर इंजिनिअरिंग तसेच विविध औद्योगिक क्षेत्रात उच्च कार्यक्षमतेची मटेरियल्स विकसित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान मिळणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

विजेंद्र चौधरी यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून कुटुंबीय, मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे

● विजेंद्र चौधरी यांना इंजिनिअरिंगमध्ये पीएचडी पदवी
● नॅनो-कॉम्पोझिट मटेरियल्स विषयावर संशोधन पूर्ण
● आयसीटी, मुंबई या प्रतिष्ठित संस्थेतून पदवी प्राप्त
● नॅनो-पार्टिकल्स वापरून पॉलिमर मटेरियल्सच्या गुणधर्मांवर अभ्यास
● औद्योगिक वापरासाठी उच्च कार्यक्षमतेचे मटेरियल विकसित होण्यास मदत
● इंजिनिअरिंग क्षेत्रात संशोधनाद्वारे यश संपादन करत विजेंद्र चौधरी यांनी नॅनो-कॉम्पोझिट मटेरियल्स या विषयावर पीएचडी पदवी मिळवली. त्यांच्या संशोधनामुळे पॉलिमर मटेरियल्स अधिक मजबूत आणि उष्णतारोधक बनवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान मिळणार आहे.

ई पेपर वाचा
सांज दैनिक बीड
वास्तव
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com